# ‘सायबर गुन्हे रोखण्यासाठी मार्गदर्शन’

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** सायबर सुरक्षा व्हावी यासाठी प्रयत्नशील असून कक्ष तयार करण्याचे काम लवकरच सुरु होईल. सायबर पिडितांना मदतीचा हात व मार्गदर्शन दिले जाईल, अशी माहिती क्विक हिल फौंडेशनच्या विभागीय समन्वयक गायत्री पवार-केतकर यांनी दिली.

सायबर गुन्हे रोखण्यासाठी मराठा छावणी व क्विक हिल फौंडेशनच्यावतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पवार-केतकर म्हणाल्या की, सध्या सायबर जगात घडत असलेली सायबर गुन्हेगारी वाढत असून निरपराध लोक याला बळी पडत आहेत. गुन्हेगार नुसतेच खात्यामधून पैसे काढत नाहीत तर आता नवनव्या ब्लॅकमेल करण्याच्या पद्धती अवलंबत आहेत. ज्यामध्ये बळी ठरलेल्या व्यक्तींबरोबर त्यांचे कुटुंब, इष्ट मित्र हे सुध्दा टार्गेट केले जात आहेत. कोरोना नंतरच्या या धकाधकीत प्रत्येकजण ऑनलाईन जगात वावरत आहे. फेसबूक, व्हॉटस अप,ट्विटर,इनस्टाग्राम, माध्यमं ऑनलाईन पेमेंट यासारखी प्रणाली डोकंदुखी झाली आहेत. हेच जग आता आपल्या सर्वांच्या आयुष्याचा अविभाज्य घटक बनले आहे. सायबर फसवणूक आणि गुन्हेगारी वाढत असून याला आळा कसा घालावा याची माहिती जनसामान्यांना दिली पाहिजे. क्विक हिल फाउंडेशन ह्या समाजसेवी संस्थेने, सायबर सुरक्षा जागरूकता ही लोकांपर्यंत पोचावी यासाठी उत्तम मार्गदर्शिका तयार केली असून तो तरुणांपर्यत पोहचवण्याचा प्रयत्न करणार आहे, अशी माहिती गायत्री पवार-केतकर यांनी बैठकीत दिली. यावेळी श्रीकांत शिंदे, संगिता मोरे, सर्जेराव पाटील, संजय कोरे, सचिन सगरे, विवेक पवार, ॲड.अवधूत देशपांडे, सूयोग हावळ, ओंकार पाटणे, ॲड.विकास गोसावी, योगेश नाडकर्णी उपस्थित होते.



मराठा छावणी आणि क्विक हिल फौंडेशनच्यावतीने सायबर गुन्हे रोखण्यासाठी बैठक झाली.